अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । गुरुवार
२२.१०.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: २६२ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### सामायिक सातबारा जमीन विक्रीबाबत राज्य सरकारचा महत्वाचा निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्रात सामाईक नावे असलेल्या ७/१२ जमिनींच्या हिस्से विक्रीवरून सहहिस्सेदारांमध्ये निर्माण होणारे वाद आणि वाढत्या न्यायालयीन याचिकांवर आळा घालण्यासाठी राज्य शासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाने यासंदर्भात एक नवीन आणि स्पष्ट शासन परिपत्रक जारी केले आहे. महसूल विभागाने जारी केलेल्या शासन परिपत्रकानुसार, नोंदणीकरिता दाखल होणाऱ्या दस्तामधील सामाईक जमिनीच्या हिस्से विक्रीबाबत दुय्यम निबंधकांसाठी नियमावली स्पष्ट करण्यात आली आहे.

# ५०० कोटींचा बॉम्ब, श्रीकांत शिंदेंचं नाव

## मनोज जरांगेंनी ऐकवलेल्या ऑडिओ क्लिपमधील आवाज कुणाचे?

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आज पत्रकार परिषद घेऊन खळबळजनक ऑडिओ क्लिप ऐकवली. या ऑडिओ क्लिपमध्ये शिंदेंच्या शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्फत मनोज जरांगेंना ५०० कोटी रुपये पोहोचवल्याचा उल्लेख आहे. तसेच भाजपकडून षडयंत्र रचलं जात असल्याचा दावा देखील मनोज जरांगेंनी केला आहे. मात्र एबीपी माझा या ऑडिओ क्लिपची पुष्टी करत नाही.

मनोज जरांगेंनी भर पत्रकार परिषदेत ऐकवलेली ऑडिओ क्लिपमध्ये तीन ते चार व्यक्तींचे आवाज ऐकू येत आहेत. त्यामुळे या ऑडिओ क्लिपमधील आवाज नेमके कुणाचे आहेत?, याबाबत चर्चा रंगली आहे. याचदरम्यान, मनोज जरांगेंनी सादर केलेली ऑडिओ क्लिप खरी असेल, तर ही खूप गंभीर बाब आहे. ऑडिओ क्लिप कुणी व्हायरल केली?, ऑडिओ क्लिप खरी असल्यास भाजपने स्पष्टीकरण द्यावं, अशी मागणी मंत्री आणि शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार उदय सामंत यांनी केली आहे. ऑडिओ क्लिपची चौकशी करा, यामधील आवाजाची चौकशी करा...यानंतर दूध का दूध पानी का पानी होईल, असंही उदय सामंत म्हणाले. मनोज जरांगेंनी ऐकवलेल्या ऑडिओ क्लिपमध्ये काय? रांगे पाटील को ऑलरेडी ५०० करोड रुपये पहुँच चुके है... श्रीकांत शिंदे के पाससे पहुँच चुके है... जरांगे पाटील विधानसभा चुनाव मे हमारे फायदे का रहेगा या...नहीं रहेगा..इससे मेरा मत अलग है, कॅल्क्युलेशन अलग है.. आप जो सोचते है, जो तथ्य है वो तो है ही... मनोज जरांगेंचा एकनाथ शिंदेंवर नेमका आरोप काय?

एकनाथ शिंदेसाहेब तुम्ही दिल्लीतील भाजपच्या लोकांना माझ्याबद्दल काय सांगितलं? मनोज जरांगे पाटलांना ५०० कोटी रुपये द्यायचेत आणि एकनाथ शिंदेसाहेब तुम्ही भाजपकडून ५०० कोटी रुपये घेऊन मला दिलेत असं तुम्ही भाजपच्या नेत्याला सांगितलं का?, कारण ते नेते कुजबुज करायला लागले आहेत.

# कुंभमेळ्यासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंना निमंत्रण : मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने घेतली भेट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## ३१ ऑक्टोबरला नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे सोहळा



**नवी दिल्ली** – नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या शुभारंभानिमित्त ३१ ऑक्टोबर रोजी आयोजित ध्वजारोहण सोहळ्याचे निमंत्रण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना देण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राज्य मंत्रिमंडळातील मंत्री आणि अधिकारी-पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने राष्ट्रपती भवन येथे त्यांची भेट घेतली.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी राष्ट्रपतींना ध्वजारोहण सोहळ्याचे औपचारिक निमंत्रण दिले. तसेच महाराष्ट्राची आध्यात्मिक परंपरा, आदिवासी उद्योजकता, वस्त्रकला, कृषिसमृद्धी आणि खाद्यसंस्कृती यांची ओळख करून देणारा विशेष भेटवस्तू संचही सादर केला. ध्वजारोहणाच्या दिवशी होणाऱ्या गोदा आरतीसह नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या संकेतस्थळाचे उद्घाटन, कुंभमेळा गीताचे लोकार्पण, कॉफी टेबल बुकचे प्रकाशन आणि कुंभमेळ्यावरील टपाल तिकिटाच्या अनावरणासाठीही राष्ट्रपतींना निमंत्रित करण्यात आले.

या वेळी मंत्री छगन भुजबळ, गिरीश महाजन, दादाजी भुसे, नरहरी झिरवाळ, नाशिकच्या महापौर हिमगौरी आडके-आहेर, त्र्यंबक नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार, पुरोहित संघांचे पदाधिकारी आणि कुंभमेळा प्राधिकरणाचे अधिकारी उपस्थित होते.

भेटवस्तू संचात शबरी नॅचरल्सची अगरबत्ती, भरडधान्यांपासून तयार केलेले पदार्थ, मोहफुलांची उत्पादने, बांबूच्या वस्तू आणि वनमध यांचा समावेश आहे. येवला येथील पैठणी, काळ्या मनुका, काजू, नाशिकचा चिवडा, मिठाई आणि सुकामेवा यांचाही या संचात समावेश असून, त्यातून महाराष्ट्राची हस्तकला, कृषिसमृद्धी, खाद्यसंस्कृती आणि आदिवासी उद्योजकतेचे दर्शन घडते.

# घरासमोर ठेवलेली मोटरसायकल चोरीला

## तालुक्यातील वघाळ येथील घटना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – येथुन जवळच असलेल्या वघाळ येथे घरासमोर ठेवलेली मोटरसायकल अज्ञात चोरटयांनी लंपास केल्याची घटना घडली. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात चोरटयाविरुध्द चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी छोटु सैफुल्लाखॉ पठाण यांनी त्यांचे ताब्यातील १० हजार रुपये किंमतीची एम.एच.४० बीपी ८७२८ क्रमांकाची मोटरसायकल त्यांचे घरासमोर असलेल्या रस्त्यावर उभी करुन घराचे समोर असलेल्या गोठयात गोऱ्हे आणण्याकरीता गेले असता कोणीतरी अज्ञात इसमाने मोटरसायकल चोरुन नेली.

या प्रकरणी छोटु सैफुल्लाखॉ पठाण (५३) रा.बेनोडा (शहीद) यांचे तक्रारीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरटयाविरुध्द कलम ३०३ (२) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सुरु आहे.

# रोटावेटरमध्ये अडकून शेतमजुराचा दुर्दैवी मृत्यू! मृताच्या मुलाचा घातपाताचा आरोप

## सायवाडा शिवारातील हृदयद्रावक घटना | ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल | पोलिसांकडून ट्रॅक्टर जप्त करुन तपास सुरु

(कुमार तटटे)



**नरखेड** – तालुक्यातील सायवाडा शिवारात शेतात काम करत असताना रोटावेटरमध्ये अडकल्याने एका शेतमजुराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास घडली. बाबाराव काळे (वय ६०, रा.थडीपवनी) असे मृत शेतमजुराचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, मृताच्या मुलाने हा अपघात नसून घातपात असल्याचा संशय व्यक्त करत शेतमालक आणि ट्रॅक्टर चालकावर गंभीर आरोप केले आहेत.

**शेतात काम करताना काळाचा घाला!**

मिळालेल्या माहितीनुसार, बाबाराव काळे हे सायवाडा शिवारातील सेवानिवृत्त पटवारी कृष्णराव हरले यांच्या शेतात मजुरीसाठी गेले होते. शेतात रोटावेटरचे काम करण्यासाठी ट्रॅक्टर भाड्याने बोलावण्यात आला होता. मंगळवारी दुपारपासून शेतात रोटावेटरच्या साहाय्याने काम सुरू होते.

सायंकाळी सुमारे ४ वाजता शेतातील ठिबक सिंचनाच्या नळ्या ट्रॅक्टरमध्ये अडकू नयेत, यासाठी बाबाराव काळे या नळ्या बाजूला करण्याचे काम करत होते. याचदरम्यान एक नळी ट्रॅक्टरच्या रोटावेटरमध्ये अडकल्याने ती काढण्याच्या प्रयत्नात काळे रोटावेटरमध्ये अडकल्याचे ट्रॅक्टर चालकाने सांगितल्याची माहिती आहे. या भीषण घटनेत त्यांचा मृत्यू झाला.

**पोलिसांकडून घटनास्थळाचा पंचनामा**

घटनेची माहिती मिळताच नरखेडचे ठाणेदार विनोद जांभळे हे पोलिस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पुढील तपासाची कार्यवाही सुरू केली. मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात नेणे शक्य नसल्याने मेंढला येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलावून शेतातच शवविच्छेदन करण्यात आले. या प्रकरणी पोलिसांनी ट्रॅक्टर चालक प्रवीण हरिहर गायनेर याला ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस), २०२३ च्या कलम १०५ अन्वये गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून ट्रॅक्टरही जप्त केला आहे.

**मृताच्या मुलाचा घातपाताचा आरोप**

“दरम्यान, बाबाराव काळे यांचा मुलगा रोशन काळे याला घटनेची माहिती मिळताच तो घटनास्थळी पोहोचला. तेथे त्याला घटनेची माहिती देण्यात आली. मात्र, वडिलांचा मृत्यू ज्या परिस्थितीत झाला, त्याबाबत त्याने संशय व्यक्त केला आहे. हा केवळ अपघात नसून, यामागे घातपात असण्याची शक्यता असल्याचा आरोप त्याने केला. तसेच या प्रकरणात शेतमालक आणि ट्रॅक्टर चालक दोषी असल्याचा दावा करत आपल्या वडिलांचा खून झाल्याचा आरोपही त्याने केला आहे.

# चुलत भाऊ आणि कुटूंबियांमध्ये हाणामारी : १ जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## तालुक्यातील नांदगाव येथील घटना




**वरुड** – तालुक्यातील नांदगाव येथे चुलत भावांमध्ये झालेल्या भांडणात एकाच मारहाण करुन जखमी केल्या प्रकरणी तिघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

सविस्तर माहीतीनुसार, फिर्यादी आणि आरोपी हे नात्याने चुलत भाऊ असून दोघांचे शेजारी शेजारी शेत आहे व वर्धा नदीमधुन शेतीला प्रत्येकी ८ दिवस प्रमाणे पाणी देतात. घटनेच्या दिवशी दुपारी १.३० वाजताचे दरम्यान आरोपी क्र.२ भरत हा फियार्दीचे घरासमोर आला आणि शिविगाळ करुन लागला तसेच आरोपी क्र.१ याने फिर्यादीचे वडिल नारायण भड यांना थापडभुक्क्यांनी व लाकडी काठीने डोक्यावर मारहाण केली तसेच आरोपी क्र.३ सुनिता हिने सुध्दा शिविगाळ करुन मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी नितीन नारायण भड यांचे फिर्यादीवरुन बेनोडा (शहीद) पोलिसांनी वैभव अरुण भड, भरत अरुण भड, सुनिता अरुण भड यांचे विरुध्द कलम ११८ (१), ३५२, ३५१ (२), ३ (५) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सुरु आहे.




### तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीत

# शांतिनिकेतन इंग्रजी शाळेच्या विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि सर्जनशीलतेला चालना मिळावी, या उद्देशाने आयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीत स्थानिक शांतिनिकेतन इंग्रजी शाळेच्या विद्यार्थ्यांनी



उत्स्फूर्त सहभाग नोंदवुन आपल्या कल्पकतेची चुणूक दाखवून दिली.

गेल्या १५ व १६ ऑक्टोबर रोजी जनता गर्ल्स हायस्कूल शेंदुरजनाघाट येथे आयोजित या विज्ञान प्रदर्शनीमध्ये विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित प्रकल्प सादर केले. पर्यावरण संवर्धन, हरित ऊर्जा, आधुनिक तंत्रज्ञान, जलसंवर्धन आणि नाविन्यपूर्ण वैज्ञानिक प्रयोगशाळा विषयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विज्ञानाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व प्रभावीपणे मांडले. या विज्ञान प्रदर्शनीमध्ये गट ६ ते ८ मधून अंकिता राजू कुमरे हिने सहभाग घेतला तर गट ९ ते १२ मधून अब्दुल काशीफ अब्दुल वाहिद याने द्वितीय क्रमांक पटकाविला.

विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व वैज्ञानिक दृष्टिकोनाचे उपस्थितांनी कौतुक केले. या यशासाठी मुख्याध्यापक विवेक ठवळी, उपमुख्याध्यापिका शालिनी देशमुख तसेच मार्गदर्शक शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांच्या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

---

# वाहनधारकांची टोलनाक्यावर होणारी पिळवणुक थांबवा

### शिवसेनेची तहसिलदारांकडे निवेदनाव्दारे मागणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील वाहनधारकांची टोलनाक्यावर होणारी पिळवणुक थांबवून स्थानिक वाहनधारकांना मोफत टोल पास देण्याबाबत व ८ दिवसांत योग्य कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी करणारे निवेदन शिवसेनेच्या वतीने तहसिलदारांना देण्यात आले.



या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, वरुड तालुक्यातील वाहनधारकांना टोल नाक्यावर आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असून यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. वरुड तालुक्यातील विविध ठिकाणांमधील अंतर पुढीलप्रमाणे आहे.

वरुड ते निंभी टोलनाका ४३ कि.मी., वरुड ते पुसला टोलनाका १२ कि.मी., वरुड ते दुर्गवाडा टोलनाका २० कि.मी., निंभी ते नांदगाव पेठ टोलनाका ४१ कि.मी. अशी अंतर आहेत.

या सर्व टोलनाक्यांमधील अंतर शासनाच्या नियमानुसार दोन टोलनाक्यांमधील अंतर ६० कि.मी. असावे, अशी तरतूद असल्याचा मुद्दा उपस्थित होत आहे. त्यामुळे संबंधित टोलनाक्यांमधील अंतर व लागु असलेले नियम आणि टोल वसुलीची वैधता यांची प्रशासनाने तातडीने तपासणी करावी. वरुड तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर, व्यापारी, नोकरदार तसेच दररोज प्रवास करणाऱ्या स्थानिक वाहनधारकांना टोलचा आर्थिक भार सहन करावा लागत आहे.

त्यामुळे वरुड तालुक्यातील स्थानिक वाहनधारकांना मोफत टोल पास देण्यात यावा, अशी मागणी शिव वाहतूक चालक मालक सेना विधानसभा समन्वयक गब्बर पठाण, उपाध्यक्ष तालुकाप्रमुख सुरेंद्र ठाकरे, उपतालुकाप्रमुख अरविंद हिवसे, शेतकरी संघटनेचे नेते दिलीप भोयर, तालिष पठाण, जाकिर नवाब, अंकुश बोडनासे, युवराज कराळे, गणेश कुशराम, विलास गिरी, सुरेश नेहारे, दादाराव टिकर आदींनी केली आहे.

---

# झटामझिरीमध्ये नागरिकांची पाण्यासाठी वणवण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

### नागरिकांमध्ये असंतोष : पाणी उपलब्ध करुन देण्याची मागणी

**वरुड** – सणासुदीच्या दिवसांत नागरिकांना मुलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असल्याचे चित्र झटामझिरी येथे पाहायला मिळत आहे. गेल्या तीन ते चार दिवसांपासून गावातील पाणीपुरवठा बंद असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. आज दसऱ्यासारखा महत्त्वाचा सण असतानाही पाणी उपलब्ध नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे.



दसऱ्याच्या सणानिमित्त घरातील स्वच्छता, स्वयंपाक, धार्मिक विधी आणि इतर कामांसाठी पाण्याची आवश्यकता असते. मात्र, सलग ३ ते ४ दिवस पाणीपुरवठा बंद असल्याने नागरिकांना पाण्याची व्यवस्था करण्यासाठी धावपळ करावी लागत आहे.

ग्रामपंचायतीवर प्रशासक असल्याच्या पार्श्वभूमीवर गावातील मूलभूत सुविधांच्या व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पाणीपुरवठ्यासारखी अत्यावश्यक सेवा सुरळीत ठेवण्याची जबाबदारी संबंधित प्रशासनाची असताना नागरिकांना इतके दिवस पाण्याविना राहावे लागत असल्याने नाराजी व्यक्त होत आहे. गावकरी मोठ्या प्रमाणात गावाजवळील आजूबाजूच्या विहिरींवरुन पाणी आणत असल्याने पाण्याच्या शुद्धतेबद्दल सुध्दा प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. जर या पाण्यामुळे दरम्यानच्या काळात नागरिकांच्या आरोग्यात बिघाड झाल्यास याला जबाबदार कोण? अशा सुध्दा सवाल उपस्थित केला जाऊ लागला. गावाला सरपंच नसल्याने किंवा प्रशासनावर नियंत्रण नसल्याने गावकऱ्यांच्या मुलभूत प्रश्न मागे सुटत तर नाही असाही सवाल गावकऱ्यांमध्ये निर्माण होऊ लागला आहे. लवकरात लवकर गावकऱ्यांना पाणी पुरवठा उपलब्ध करुन द्या, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

---

# श्री चिंतेश्वर दत्त मंदीर येथे नवरात्रीनिमित्त भव्य सत्संग व नवरात्री महोत्सव उत्साहात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथील दत्तात्रय नगर परिसरातील श्री चिंतेश्वर दत्त मंदीर येथे नवरात्रीनिमित्त भव्य सत्संग व नवरात्री महोत्सव उत्साहात संपन्न झाला.



नवरात्रीनिमित्त गेल्या ११ ऑक्टोबर पासून सुरु झालेला नवरात्र महोत्सवाचा समारोप १९ ऑक्टोबर रोजी करण्यात आला. सर्वज्ञ महिला मंडळाच्या वतीने दररोज सकाळी सूत्र पाठ वाचन, दुपारी लीळा वाचन, सायंकाळी देवपूजा, प्रसाद वंदन तसेच नामस्मरण सोहळा सुरु होता.

या सोहळ्याला २८ सदभक्त मुक्कामी होते. मुक्कामी असणाऱ्या तसेच नामस्मरणाकरिता येणाऱ्या सर्व सदभक्तांसाठी दररोज नवही दिवस परमसेवक भक्तांकडून चहापाणी, उदक, भोजनाचे व श्री चक्रधर मंडळाकडून त्यांचे राहण्याची व्यवस्था श्री चिंतेश्वर दत्त मंदिर पंचकृष्ण चौक वरुड येथे करण्यात आली. समाप्तीचे दिवशी श्री चक्रधर मंडळ तर्फे सामुहिक पंगत देण्यात आली. यावेळी ७००ते ८०० सदभक्तांनी भोजनाचा लाभ घेतला व सोहळा आनंदात संपन्न झाला.

या संपूर्ण सोहळ्याकरिता संस्थेचे अध्यक्ष उज्वल डाहाके व सचिव विनय चौधरी तसेच संपूर्ण विश्वस्त मंडळाने व महिला मंडळाने मेहनत घेऊन नवरात्री महोत्सव दरवर्षीप्रमाणे याही वर्षी उत्साहात संपन्न केला.



---

# गरबा खेळणाऱ्या महिलांवर हेडलाईट चमकवल्याच्या वादातून हत्या

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जळगाव** – गरबा खेळणाऱ्या महिलांवर दुचाकीचा हेडलाईट चमकवल्याच्या वादातून चॉपरने वार करून ४० वर्षीय व्यक्तीची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना जळगाव शहरातील माउली नगरात मंगळवारी रात्री घडली.




किरण विठ्ठल पाटील असे मृताचे नाव असून, किशोर छगन पाटील हे या हल्ल्यात गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. माउली नगरात दुर्गा मंडळाच्या वतीने गरबा-दांडियाचे आयोजन करण्यात आले होते. मंगळवारी रात्री गरबा सुरू असताना दुचाकीवरून आलेल्या तीन तरुणांनी महिलांवर हेडलाईट चमकवल्याने वादाला सुरुवात झाली. याबाबत विचारणा केल्यानंतर वाद वाढला. किरण पाटील आणि किशोर पाटील यांनी मध्यस्थी करून वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. मात्र, वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. यावेळी एका संशयिताने चॉपरने किरण पाटील यांच्या छातीवर वार केले.

गंभीर जखमी झालेल्या किरण यांचा मृत्यू झाला, तर किशोर पाटील जखमी झाले. या घटनेत मयूर जाधव, रोहित पाटील आणि अन्य एका तरुणाचा सहभाग असल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेनंतर संशयित पसार झाले असून, त्यांच्या शोधासाठी एमआयडीसी पोलिसांनी तीन पथके रवाना केली आहेत. याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

---

# सुप्रसिद्ध गायक बाबलेश गडलिंग यांचा कृतज्ञता सोहळा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

### मित्रपरिवाराच्या वतीने डॉ.आंडे हॉस्पिटलमध्ये आयोजन

**वरुड** – स्वर, साधना आणि अढळ संकल्पाचा अद्वितीय संगम घडवून आणत सतत ७२ तास अविरत गायनाचा विश्वविक्रम प्रस्थापित करणारे सुप्रसिद्ध गायक बाबलेश गडलिंग यांच्या या ऐतिहासिक पराक्रमाला १८ ऑक्टोबर रोजी १० वर्षे पूर्ण झाली. एका दशकापूर्वी संगीतविश्वात उमटलेल्या या दैदिप्यमान स्वराविष्काराच्या सुवर्णस्मृतींना उजाळा देण्यासाठी आंडे हॉस्पिटलच्या सभागृहात मित्र परिवाराच्या वतीने एका विशेष व हृदयस्पर्शी कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. डॉ.मनोहर आंडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेला हा सोहळा



केवळ एक औपचारिक सत्कार न ठरता, आठवणींच्या हिंदोळ्यावर झुलणारा एक आत्मीय स्वरोत्सव ठरला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य प्रा.किशोर तडस यांनी आपल्या ओघवत्या आणि अभ्यासपूर्ण प्रास्तविकातून गडलिंग यांच्या संगीताप्रती असलेल्या अथांग निष्ठेचा आणि एका दशकापूर्वीच्या त्या अदभूत क्षणांचा गौरवपूर्ण आढावा मांडला तर संपूर्ण कार्यक्रमाचे रसमय व प्रभावी संचालन रक्तवीर सामाजिक बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र शेटिये यांनी केले.अध्यक्षीय मनोगतातून डॉ.मनोहर आंडे यांच्यासह हरी सेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष नितीन खेरडे आणि नरेंद्र पाटील, संजय खासबागे यांनी आपल्या प्रभावी भाषणातुन १० वर्षांपूर्वी घडलेल्या त्या ७२ तासांच्या प्रदीर्घ संगीत तपस्येचा पट श्रोत्यांसमोर उलगडून दाखवला. सलग तीन दिवस आणि तीन रात्री भुकेची, तहानेची अनब शारीरिक मर्यादांची पर्वा न करता केवळ सुरांच्या ध्यासाने भारून गात राहणे ही मानवी सहनशक्तीची सर्वोच्च परीक्षा होती. गडलिंग यांनी आपल्या अढळ आत्मविश्वासाने आणि अखंड रियाजाने हा अग्निदिव्य टप्पा लिलया पार करून संपूर्ण विदर्भाचे नाव आंतरराष्ट्रीय पटलावर सुवर्णाक्षरांनी कोरले, अशा उत्कट भावना मान्यवरांनी मनोगतातून व्यक्त केल्या. प्रसंगी ऑक्टोपॅड वादक चेतन चोबितकर यांचाही ७२ तास सतत वादन केल्यानिमित्ताने सत्कार करण्यात आला. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि कृतज्ञता चिन्ह प्रदान करून गायक बाबलेश गडलिंग यांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना गडलिंग अत्यंत गहिवरुन गेले. हा ऐतिहासिक विक्रम केवळ माझ्या एकट्याचा नसून त्या ७२ तासांच्या प्रवासात दिवस-रात्र डोळ्यांत तेल घालून पाठीशी उभे राहिलेले सर्व स्नेही, रसिकजन आणि ईश्वरी कृपेचे हे फलित आहे, अशी नम्र भावना त्यांनी व्यक्त केली. या ऐतिहासिक दशकपूर्ती सोहळ्याला जायंटस ग्रुपचे माजी अध्यक्ष योगेश्वर खासबागे, नरेंद्र काळे, दिलीप टाकरखेडे, चेतन चोबितकर, गोंडाणे, श्रीकांत थेरे, पंकज लेकुरवाळे, अशोक गडलिंग, प्रवीण काळे, डॉ.आनंद झामडे, हरिहर वरुडकर, नरेंद्र पाटील, अरुण तायडे, सुधिर कांबळे, नरेंद्र वऱ्होकर, यांच्यासह मित्र परिवारातील सदस्य आणि परिसरातील संगीतप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित

# संपादकीय

**स्वत:च्या क्षमतांवर विश्वास ठेवा आणि आपल्या स्वप्नांना पंख द्या.**

## अर्थसंकटाने ग्रासलेला क्युबा

क्युबा हा एकेकाळी क्रांती, स्वाभिमान आणि साम्राज्यवादाविरोधातील संघर्षाचे प्रतीक म्हणून ओळखला जाणारा देश आज गंभीर आर्थिक आणि सामाजिक संकटाच्या गर्तेत सापडला आहे. देशातील वीज आणि पाणीटंचाई, अस्वच्छता, संसर्गजन्य आजारांचा वाढता धोका, प्रचंड महागाई, बेरोजगारी आणि अन्नधान्याचा तुटवडा यांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन अत्यंत हलाखीचे बनले आहे. जगण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधाच उपलब्ध होत नसतील, तर विकासाच्या आणि सामाजिक न्यायाच्या घोषणांना अर्थ काय उरतो, हा प्रश्न क्युबाच्या सद्य:स्थितीने उपस्थित केला आहे. क्युबाच्या आर्थिक संकटामागे अनेक परस्परांशी जोडलेली कारणे आहेत. अमेरिकेने अनेक दशकांपासून लादलेले आर्थिक निर्बंध, परकीय चलनाची कमतरता, पर्यटन क्षेत्रावरील प्रतिकूल परिणाम, उत्पादनातील घट आणि आर्थिक व्यवस्थेतील संरचनात्मक त्रुटी यांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. त्यातच इंधन आणि आवश्यक वस्तूंच्या आयातीतील अडचणींमुळे वीजपुरवठा वारंवार खंडित होतो. वीज नसल्याने पाणीपुरवठा, रुग्णालये, उद्योगधंदे आणि वाहतूक व्यवस्था प्रभावित होतात. उद्योग बंद पडले की रोजगार कमी होतात; रोजगार घटले की नागरिकांची क्रयशक्ती कमी होते. परिणामी अन्नधान्य आणि औषधांसारख्या जीवनावश्यक वस्तू मिळवणेही सामान्य माणसासाठी कठीण बनते. अशा रीतीने एक संकट दुसऱ्या संकटाला जन्म देते आणि देश दुष्टचक्रात अधिकाधिक अडकत जातो. या संकटाचा सर्वाधिक फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. बाजारपेठेत वस्तू उपलब्ध नसणे, उपलब्ध वस्तूंचे आवाक्याबाहेर गेलेले दर आणि उत्पन्नाच्या मर्यादित संधी यांमुळे कुटुंबांचा उदरनिर्वाह कठीण झाला आहे. वीजपुरवठा खंडित झाल्याने अन्नसाठवणुकीपासून आरोग्यसेवेपर्यंत अनेक बाबींवर परिणाम होतो. पाणीटंचाई आणि स्वच्छतेचा अभाव यांमुळे संसर्गजन्य आजारांचा धोका वाढतो. औषधे, वैद्यकीय उपकरणे आणि आरोग्यसेवांसाठी आवश्यक साधनसामग्रीची कमतरता असेल, तर आरोग्यव्यवस्थेवरील ताण आणखी वाढतो. अशा परिस्थितीत सर्वाधिक असुरक्षित ठरतात ती लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आधीच आर्थिक अडचणींशी झुंज देणारी कुटुंबे. क्युबाच्या संकटाचे विश्लेषण करताना केवळ अमेरिकेचे निर्बंध किंवा केवळ तेथील सरकारची धोरणे यांपैकी कोणत्याही एका घटकाला संपूर्ण जबाबदार धरणे पुरेसे ठरणार नाही. अमेरिकी निर्बंधांमुळे व्यापार, वित्तपुरवठा आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारांवर मर्यादा येतात; त्याच वेळी देशांतर्गत आर्थिक धोरणे, उत्पादनक्षमता, गुंतवणुकीचे वातावरण आणि व्यवस्थापनातील मर्यादा यांचाही परिणाम होतो.

# शेतकरी विकसित भारताच्या केंद्रस्थानी

भारत हा कृषिप्रधान देश असून देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतकऱ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. शेतकरी हा केवळ अन्नदाता नसून देशाच्या विकासाचा खरा आधारस्तंभ आहे. त्यामुळे विकसित भारताचे स्वप्न साकार करताना शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

आजच्या बदलत्या काळात शेतीसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. हवामानातील बदल, अनियमित पाऊस, वाढता उत्पादन खर्च, पिकांना मिळणारा अपुरा भाव आणि बाजारपेठेतील अनिश्चितता यांमुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, योग्य मार्गदर्शन आणि आर्थिक पाठबळ मिळणे गरजेचे आहे.




**डिजिटल तंत्रज्ञानाची महत्त्वपूर्ण भूमिका**

आधुनिक शेतीमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. मोबाईलच्या माध्यमातून हवामानाचा अंदाज, बाजारभाव, पीक व्यवस्थापन आणि शासकीय योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचू शकते. कृत्रिम बुद्धिमत्ता, ठिबक सिंचन, मृदा परीक्षण आणि आधुनिक कृषी यंत्रसामग्रीच्या वापरामुळे उत्पादन खर्च कमी करून उत्पादकता वाढविणे शक्य आहे.

मात्र, या तंत्रज्ञानाचा लाभ केवळ मोठ्या शेतकऱ्यांपुरता मर्यादित न राहता अल्पभूधारक आणि छोट्या शेतकऱ्यांपर्यंतही पोहोचला पाहिजे. त्यासाठी ग्रामीण भागात डिजिटल साक्षरता वाढविणे आणि शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

**शेतमालाला योग्य भाव मिळणे गरजेचे**

शेतकरी दिवसरात्र मेहनत करून अन्नधान्याचे उत्पादन घेतो. परंतु उत्पादनाला योग्य बाजारभाव मिळाला नाही, तर त्याच्या कष्टाचे अपेक्षित फळ मिळत नाही. त्यामुळे शेतमालाची साठवणूक, प्रक्रिया उद्योग, थेट विक्री व्यवस्था आणि बाजारपेठेपर्यंत सुलभ पोहोच यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांच्या माध्यमातून शेतकऱ्यांची आर्थिक ताकद वाढविता येऊ शकते.

**पाणी व्यवस्थापन आणि शाश्वत शेती**

विकसित भारताच्या वाटचालीत पाणी व्यवस्थापन आणि पर्यावरणपूरक शेतीलाही महत्त्व आहे. पावसाच्या पाण्याचे संधारण, ठिबक सिंचन, सेंद्रिय खतांचा संतुलित वापर आणि जमिनीची सुपीकता टिकवून ठेवणाऱ्या पद्धतींचा अवलंब करणे काळाची गरज आहे. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करतानाच नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

**छोट्या शेतकऱ्यांचा सहभाग महत्त्वाचा**

भारताच्या कृषी क्षेत्रात छोट्या आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे कृषी विकासाच्या प्रत्येक योजनेत त्यांचा सक्रिय सहभाग असणे आवश्यक आहे. कृषी कर्ज, पीक विमा, संशोधन, प्रशिक्षण आणि सरकारी योजनांचा लाभ पारदर्शकपणे मिळाला, तर शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढेल. शेतीला फायदेशीर व्यवसाय बनविण्यासाठी शासन, कृषी तज्ज्ञ, संशोधन संस्था आणि शेतकरी यांच्यात समन्वय असणे गरजेचे आहे.

विकसित भारताची संकल्पना केवळ मोठे उद्योग, आधुनिक शहरे आणि डिजिटल सुविधा यांपुरती मर्यादित नाही. देशातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम, तंत्रज्ञानस्नेही आणि समाधानी झाला, तरच विकासाला खरा अर्थ प्राप्त होईल. छोट्या शेतकऱ्यांना समृद्धीच्या नव्या प्रवाहात सहभागी करून घेणे ही विकसित भारताच्या वाटचालीतील महत्त्वाची अट आहे.

शेतकऱ्यांच्या कष्टाला योग्य मोबदला, आधुनिक तंत्रज्ञानाची साथ आणि विकासाच्या समान संधी मिळाल्या, तर भारतीय शेती अधिक सक्षम होईल. शेतकऱ्यांची प्रगती म्हणजे देशाची प्रगती आणि शेतकरी समृद्ध झाला, तरच विकसित भारताचे स्वप्न खऱ्या अर्थाने साकार होईल.

# गिलगिट-बाल्टिस्तानचा असंतोष आणि काश्मीर प्रश्नाचे बदलते वास्तव

१९४७ च्या फाळणीनंतर जम्मू-काश्मीरच्या विलिनीकरणातून निर्माण झालेला प्रश्न आजही भारत-पाकिस्तान संबंधांमधील सर्वांत संवेदनशील विषयांपैकी एक आहे. या प्रश्नात गिलगिट-बाल्टिस्तान या सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या प्रदेशाची भूमिका विशेष आहे. हिमालय, काराकोरम आणि हिंदुकुश पर्वतरांगांच्या कुशीत वसलेला हा प्रदेश केवळ भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचा नाही, तर भारत, पाकिस्तान आणि चीन यांच्या प्रादेशिक हितसंबंधांच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचा आहे. गेल्या काही वर्षांत या भागात व्यक्त होणारा जनतेचा असंतोष, आर्थिक प्रश्न, राजकीय अधिकारांची मागणी आणि संसाधनांच्या वापराबाबतचे मतभेद यांमुळे हा प्रदेश पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.




फाळणीपासून आजपर्यंतचा ऐतिहासिक प्रवास १९४७ मध्ये ब्रिटिश सत्तेचा अंत झाल्यानंतर जम्मू-काश्मीर संस्थानाच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला. तत्कालीन महाराजा हरिसिंह यांनी ऑक्टोबर १९४७ मध्ये भारताशी विलिनीकरणाचा करार केला. त्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात संघर्ष सुरू झाला. त्याच काळात गिलगिटमधील ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या प्रभावाखाली उभारलेल्या गिलगिट स्काउट्सनी महाराजांच्या सत्तेविरुद्ध उठाव केला आणि पाकिस्तानशी जोडले जाण्याची भूमिका घेतली. नोव्हेंबर १९४७ पासून पाकिस्तानने या भागाचा प्रशासकीय ताबा घेतला. मात्र, या प्रदेशाच्या कायदेशीर आणि घटनात्मक दर्जाबाबतचा वाद कायम राहिला. भारताच्या अधिकृत भूमिकेनुसार, जम्मू-काश्मीर संस्थानाच्या भारतातील विलिनीकरणामुळे गिलगिट-बाल्टिस्तानसह संपूर्ण जम्मू-काश्मीर भारताचा अविभाज्य भाग आहे. दुसरीकडे, पाकिस्तान या प्रदेशाचे प्रशासन करत असून त्याच्या राजकीय भवितव्याला काश्मीर प्रश्नाशी जोडतो. त्यामुळे हा वाद केवळ जमिनीच्या ताब्यापुरता मर्यादित न राहता सार्वभौमत्व, लोकांचे राजकीय अधिकार आणि प्रादेशिक सुरक्षेशी संबंधित बनला आहे.

भौगोलिक आणि सामरिक महत्त्व गिलगिट-बाल्टिस्तान हा उंच पर्वतरांगा, हिमनद्या आणि महत्त्वाच्या खिंडींनी व्यापलेला प्रदेश आहे. हिमालय, काराकोरम आणि हिंदुकुश या पर्वतरांगांच्या परिसरात असलेल्या या भागाला चीन, पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि भारताच्या सीमावर्ती क्षेत्रांच्या जवळिकीमुळे विशेष सामरिक महत्त्व प्राप्त झाले आहे. पाकिस्तानव्याप्त भागातील असंतोषाची कारणे

गिलगिट-बाल्टिस्तानमधील असंतोषामागे ऐतिहासिक वादाबरोबरच दैनंदिन जीवनाशी निगडित अनेक प्रश्न आहेत. स्थानिक नागरिकांकडून राजकीय प्रतिनिधित्व, अधिक स्वायत्तता, आर्थिक न्याय आणि नैसर्गिक संसाधनांवरील हक्क यांसंबंधी मागण्या सातत्याने पुढे येत आहेत.

पाकिस्तानच्या राष्ट्रीय संसदेत या प्रदेशाला प्रांतांप्रमाणे पूर्ण प्रतिनिधित्व नसणे, घटनात्मक दर्जाबाबतची अनिश्चितता आणि केंद्र सरकारच्या निर्णयांवर असलेले अवलंबित्व यामुळे लोकांमध्ये नाराजी निर्माण होते. त्यातच वीजपुरवठ्यातील अडचणी, रोजगाराच्या मर्यादित संधी, महागाई, पायाभूत सुविधांची कमतरता आणि स्थानिक जमीन व खनिजसंपत्तीच्या वापराबाबतचे मतभेद या समस्या अधिक गंभीर बनतात.

या प्रदेशातील नागरिकांचा एक महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, स्थानिक संसाधनांचा वापर होत असताना त्याचा पुरेसा लाभ स्थानिक लोकांना मिळतो का? कर आकारणी, विकासनिधीचे वाटप आणि निर्णयप्रक्रियेत स्थानिक सहभाग या मुद्द्यांवरूनही मतभेद दिसून येतात. त्यामुळे असंतोषाला केवळ भारत-पाकिस्तान संघर्षाच्या चौकटीतून पाहणे अपुरे ठरते; त्यामागील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय वास्तव समजून घेणे आवश्यक आहे. सध्याची परिस्थिती आणि आंदोलनांची पार्श्वभूमी

२०२५ आणि २०२६ या काळात पाकिस्तानच्या ताब्यातील काश्मीरच्या विविध भागांत राजकीय प्रतिनिधित्व, आर्थिक सवलती आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीविरोधात आंदोलनांना तीव्रता आली. विशेषतः पाकिस्तानी काश्मीरमधील जॉइंट अवामी ॲक्शन कमिटीच्या आंदोलनांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर लक्ष वेधले. मात्र, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, गिलगिट-बाल्टिस्तान आणि तथाकथित आझाद जम्मू-काश्मीर हे पाकिस्तानच्या प्रशासनाखालील दोन वेगवेगळे प्रदेश आहेत; तेथील आंदोलने आणि त्यांची तात्कालिक कारणे एकसारखी नाहीत.

गिलगिट-बाल्टिस्तानमध्येही राजकीय अधिकार, स्थानिक नेतृत्वावरील कारवाई, आर्थिक प्रश्न आणि संसाधनांवरील हक्क यांबाबत असंतोष व्यक्त होत आला आहे. २०२६ मध्ये या प्रदेशातील घटनांबाबत उपलब्ध अहवालांतून राजकीय आणि सामाजिक तणावाचे चित्र समोर आले आहे. त्याचवेळी, पाकिस्तान सरकारने या प्रदेशातील घटनात्मक, प्रशासकीय आणि आर्थिक प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी सप्टेंबर २०२६ मध्ये उच्चस्तरीय समितीची बैठक घेतल्याची अधिकृत माहिती प्रसिद्ध केली. त्याचबरोबर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संवाद, सीमावर्ती शांतता आणि नागरिकांच्या हितांचे संरक्षण या बाबींनाही महत्त्व आहे. या प्रदेशाकडे केवळ सामरिक स्पर्धेचा भाग म्हणून न पाहता तेथील लोकांच्या आकांक्षा, सांस्कृतिक विविधता आणि सामाजिक वास्तव यांचाही विचार झाला पाहिजे.

निष्कर्ष

गिलगिट-बाल्टिस्तान हा केवळ भारत-पाकिस्तानमधील प्रादेशिक वादाचा एक भाग नाही, तर इतिहास, भू-राजकारण, लोकशाही हक्क आणि आर्थिक न्याय यांच्या गुंतागुंतीच्या संगमावर उभा असलेला प्रदेश आहे. १९४७ पासून प्रलंबित असलेल्या प्रश्नाचे स्वरूप काळानुसार बदलले असले, तरी स्थानिक नागरिकांच्या राजकीय आणि आर्थिक अपेक्षांचे महत्त्व कमी झालेले नाही.

आज या प्रदेशातील असंतोष हा प्रशासन, प्रतिनिधित्व आणि विकासाच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज अधोरेखित करतो. या प्रश्नाचे भविष्य केवळ भारत आणि पाकिस्तान यांच्या भूमिकांवर अवलंबून नसून स्थानिक जनतेच्या हक्कांना किती महत्त्व दिले जाते, यावरही अवलंबून असेल. त्यामुळे गिलगिट-बाल्टिस्तानचा प्रश्न समजून घेताना इतिहासाची पार्श्वभूमी, सामरिक वास्तव आणि मानवी पैलू या तिन्हींचा समतोल विचार करणे आवश्यक आहे.

## अतिविचार नकोच मानसिक आरोग्या करिता घातक....

विचार करणे ही मानसिक प्रवृत्ती आहे. पण अति विचार करणे ही मानसिक विकृती आहे. आपण रस्त्याने जात असताना काही स्वमग्न अवस्थेतील व्यक्ती पाहतो. काहींची तर स्वमग्न अवस्थेत काहीतरी बडबड सुद्धा चाललेली असते. ही आहे मानसिक विकृतीची अवस्था. यातून बाहेर पडण्यासाठी आपण काय करू शकतो. यावर थोडं विवेचन करू या अशा काही गोष्टी आहेत ज्या आपण केल्या तर मानसिक विकृती टाळता येते.

सर्वप्रथम आजचा विचार आज करा वर्तमानात जगायला शिका आज आपल्याला काय करायचं आहे त्या गोष्टींची यादी करा त्या आजच पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. त्या सर्व गोष्टी जेव्हा पूर्ण कराल तेव्हा एक वेगळे समाधान तुम्हाला लाभेल उद्याचा विचार आज करू नका. तुमच्या मनाला अति विचार करायला लावणाऱ्या गोष्टीबद्दल स्वतःला संवेदनशील करण्याचा प्रयत्न करा. स्वतःची मानसिक विकृती स्वीकारा व त्यापासून परावृत्त होण्याचा प्रयत्न करा. आपल्या मनातील नकारात्मक विचार बदला. आपल्या मनात नकारात्मक विचार येत असतील तर त्या विचारांना सकारात्मक करण्याची क्षमता आपल्यामध्ये निर्माण करा. मन प्रसन्न व शांत ठेवण्याचा प्रयत्न करा. दुसऱ्याशी तुलना करू नका आपण कसे परिपूर्ण आहोत हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करा .स्वतःला परिपूर्ण करण्यासाठी आपल्या क्षमता विकसित करा. प्रत्येक संधीचं सोनं करा. कोणत्याही परिस्थितीत भीतीला तुमच्यावर कब्जा करू देऊ नका. वरील गोष्टी तुम्ही जर करू शकले तर यश तुमचंच आहे.

प्रमोद ईखे नागपूर

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२,



**वरुड :** वरुड : डॉ.अमोल वैद्य जागृत विद्यालय, सावंगी येथील माजी मुख्याध्यापक अमोल कुकडे यांना वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना नगरसेवक योगेश्वर खासबागे, प्रा.अश्वपाल वानखडे, यशपाल जैन, मदन तायवाडे, राजु भडके, प्रमोद रडके, अतुल काळे, प्रमोद रडके, मोहन गणोरकर तथा अरुण महल्ले.

# एसटी कर्मचाऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – राज्य मार्ग परिवहन महामंडळाला (एसटी) आवश्यक निधी ४ नोव्हेंबरपर्यंत न दिल्यास 'खारा दिवाळी फराळ' पाठवून सरकारच्या अर्थ खात्याचा निषेध करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसने दिला आहे. एसटीने सवलत मूल्याची थकबाकी, दैनंदिन खर्चासाठी आवश्यक अतिरिक्त निधी



आणि दिवाळी भेटीची रक्कम देण्याची मागणी केली आहे. ही रक्कम ३ नोव्हेंबरपर्यंत न मिळाल्यास ४ नोव्हेंबर रोजी हे निषेध आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

एसटीने सरकारकडे निधीची मागणी केल्यानंतर अर्थ खात्याकडून वारंवार त्यात मिठाचा खडा टाकण्यात येत असल्याचा आरोप संघटनेचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला आहे. सरकारच्या या भूमिकेच्या निषेधार्थ एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी खारट करणाऱ्या अर्थ विभागाच्या अधिकाऱ्यांना 'खारा दिवाळी फराळ' पाठविण्यात येईल, असेही ते म्हणाले.

एसटीने सप्टेंबर महिन्याचे वेतन आणि थकीत देणी भागविण्यासाठी सरकारकडे १,०१५ कोटी रुपयांची मागणी केली होती. मात्र, सरकारने केवळ ३८०.०६ कोटी रुपये दिल्याने महामंडळाच्या आर्थिक अडचणी वाढतील, असा दावा त्यांनी केला.

# साईबाबांचे रत्नजडीत सुवर्ण मुकूट विश्वस्तांकडे सुपूर्द

## पत्रकार दिपक खंडेलवाल यांच्यासह कुटूंबियांचा पुढाकार

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – स्थानिक साई मंदिराचे विश्वस्त राजेश मोहनलाल खंडेलवाल (४९) यांच्या दुर्दैवी आत्महत्येनंतर त्यांच्याकडे असलेला साईबाबांचा मौल्यवान रत्नजडित सोन्याचा मुकूट पत्रकार दिपक खंडेलवाल यांच्या तत्परतेमुळे सुरक्षितरित्या मंदिर ट्रस्टच्या हवाली करण्यात आला.

प्राप्त माहितीनुसार, १८ ऑक्टोबरच्या मध्यरात्री राजेश खंडेलवाल यांनी विष प्राशन करुन आपली जीवनयात्रा संपवली. या धक्कादायक घटनेमुळे संपूर्ण शहरात हळहळ व्यक्त होत होती. ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन झाल्यानंतर, बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव या मूळ गावी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. याच दरम्यान,



साईबाबांचा रत्नजडित सोन्याचा मुकुट दिवंगत राजेश खंडेलवाल यांच्याकडे असल्याची माहिती त्यांचे मामा पत्रकार दिपक खंडेलवाल यांना मिळाली. त्यांनी या विषयाचे गांभीर्य ओळखुन तात्काळ ठाणेदार दिनेश चव्हाण यांचेशी संपर्क साधला आणि पोलीस अधिकारी व कर्मचारी, नगरसेवक गौरव इंगळे, केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष मनोज गुल्हाने, लतिक पटेल, विक्की इंगळे, रविकांत खंडेलवाल, हर्ष खंडेलवाल आणि घरमालक तुषार आजनकर यांच्या उपस्थितीत राजेश खंडेलवाल यांच्या खोलीची पाहणी करण्यात आली. या तपासा दरम्यान एका सुटकेसमध्ये साईबाबांचा हा अत्यंत मौल्यवान रत्नजडित सोन्याचा मुकूट सुरक्षित आढळला. पोलिसांनी कायदेशीर प्रक्रियेनंतर हा मुकुट दिपक खंडेलवाल यांच्या स्वाधीन केला. मुकूट ताब्यात आल्यानंतर दिपक खंडेलवाल यांनी क्षणाचाही विलंब न करता थेट साई मंदिराचे अध्यक्ष माधवराव देशपांडे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला आणि त्यांच्या सूचनेनुसार मंदिर ट्रस्टचे विश्वस्त नंदकिशोर टाकरखेडे आणि अमोल चौधरी यांना मनोज गुल्हाने यांच्या निवासस्थानी बोलावण्यात आले.

सर्वांच्या उपस्थितीत तो सोन्याचा मुकुट विश्वस्तांच्या स्वाधीन करून आपली मोठी जबाबदारी पार पाडली. दिपक खंडेलवाल यांनी दाखवलेली तत्परता, प्रामाणिकपणा आणि जबाबदारीच्या भावनेबद्दल साई मंदिर ट्रस्टच्या विश्वस्तांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# मानवविज्ञान विद्याशाखा अभ्यास मंडळाचा उदघाटन सोहळा

## मानवतेची दृष्टी व प्रेरणा अभ्यास मंडळातून मिळते : डॉ.प्रज्ञा निंभोरकर

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**शेंदुरजनाघाट** – मानवतेची दृष्टी व प्रेरणा अभ्यास मंडळातून मिळते, मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत येणाऱ्या अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल आणि गृहअर्थशास्त्र या विषयांचा मानवी जीवनाशी संबंध आहे, असे प्रतिपादन डॉ.प्रज्ञा निंभोरकर यांनी केल.



त्या जनता शिक्षण संस्थेद्वारा संचालित डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयात शैक्षणिक सत्र २०२६-२७ मधील मानवविज्ञान विद्याशाखा अभ्यास मंडळाचा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला, त्यावेळी बोलत होत्या. मानवविज्ञान विद्याशाखेचा असलेला जवळचा संबंध विविध उदाहरणांच्या माध्यमातून विशद केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रा.ना.फुलारी होते, उदघाटक डॉ.प्रज्ञा निंभोरकर, प्रमुख वक्त्या प्रा.प्रियंका जगदेवे तर प्रमुख उपस्थिती अभ्यास मंडळाच्या अध्यक्ष माला उईके, डॉ.सुधीर बानुबाकोडे आणि डॉ.तिलकचंद धोटे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.सुधीर बानुबाकोडे यांनी प्रास्ताविकातून अभ्यास मंडळाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. प्रमुख वक्त्या प्रा.प्रियंका जगदेवे यांनी विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधत त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. डॉ.तिलकचंद धोटे यांनी भूगोल विषयाचे मानवी जीवनाशी असलेले अतूट नाते विविध उदाहरणांद्वारे स्पष्ट केले. याप्रसंगी मानवविज्ञान विद्याशाखेच्या अभ्यास मंडळाची कार्यकारिणी घोषित करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन नंदिनी बावणे यांनी तर अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ.दिनेश खेरडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अनावश्यक खर्चावर नियंत्रण : वित्त विभागाचे सर्व खात्यांना निर्देश जारी

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – महसुली उत्पन्नापेक्षा सरकारचा वाढलेला खर्च, सरकारी खर्च भागवण्यासाठी उचलावे लागणारे कर्ज आणि राज्यावरील दुष्काळाचे



संकट या पार्श्वभूमीवर, खर्चाला कपात लावण्याच्या हालचाली सुरु असताना आता अधिवेशनात सादर होणाऱ्या पुरवणी मागण्यांनाही कात्री लागणार आहे. खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी अत्यावश्यक कामांसाठीच पुरवणी मागण्यांचे प्रस्ताव स्वीकारण्याचे निर्देश वित्त विभागाने सर्व खात्यांना दिले आहेत. राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला येत्या ७ डिसेंबरपासून नागपूरमध्ये सुरुवात होत आहे. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी पुरवणी मागण्या सादर केल्या जातात.

गेल्या काही वर्षात पुरवणी मागण्यांचा आकडा हजारो कोटींच्या घरात गेला आहे. जून-जुलै महिन्यात पार पडलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तब्बल ९७ हजार ७०६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर झाल्या होत्या. हिवाळी अधिवेशनातही मोठ्या आकाराच्या पुरवणी मागणीची पुनरावृत्ती होण्याची शक्यता लक्षात घेऊन वित्त खात्याने पुरवणी मागण्यांवर नियंत्रण आणण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात वित्त विभागाने बुधवारी शासन परिपत्रक जारी केले. राज्याच्या मर्यादित आर्थिक संसाधनांचा योग्य विनियोग करण्यासाठी आणि अर्थसंकल्पीय खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी केवळ अत्यावश्यक तसेच अपरिहार्य बाबींचे पूरक मागण्यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार असल्याचे परिपत्रकात नमूद केले आहे.


## जाहीर नोटीस

**रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अ‍ॅण्ड डेथ अ‍ॅक्टचे १९६९ चे कलम ८ १३ ( ३ ) अन्वये जन्माची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील विद्यमान श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब ( प्र.श्रेणी ) वरुड यांचे न्यायालयात.**

**एम.जे.सी.क्रं.२००/२०२६** **ने.ता.२६/११/२०२६**

**अर्जदार :-** दत्तु पुंजाराम गाडे
वय अं.५२ वर्ष, धंदा-मजुरी
रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** सचिव, ग्रामपंचायत कार्यालय, पुसला
ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार यांची **मुलगी नामे कु.प्रियांशु दत्तुजी गाडे, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती हिचा जन्म १५/०९/२०१० रोजी त्यांचे घरी, पुसला** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अ‍ॅण्ड डेथ अ‍ॅक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांची **मुलगी नामे कु.प्रियांशु दत्तुजी गाडे, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती हिचा जन्म १५/०९/२०१० रोजी त्यांचे घरी, पुसला** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.२६/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१९/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अ‍ॅण्ड डेथ अ‍ॅक्टचे १९६९ चे कलम ८ १३ ( ३ ) अन्वये जन्माची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब ( प्रथम श्रेणी ) यांचे न्यायालयात.**

**एम.जे.सी.क्रं.२२६/२०२६** **ने.ता.०३/१२/२०२६**

**अर्जदार :-** फरजाना बानो शाखर खाँ (माहेरचे नांव)
फरजाना बानो शेख वकील (माहेरचे नांव)
वय अं.५६ वर्ष, धंदा-गृहिणी
रा.ईस्लाम नगर, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** मुख्याधिकारी साहेब
नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे फरजाना बानो शाखर खाँ हिचा जन्म दि.०१/०७/१९७० रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अ‍ॅण्ड डेथ अ‍ॅक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **नामे फरजाना बानो शाखर खाँ हिचा जन्म दि.०१/०७/१९७० रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.०३/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१९/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अ‍ॅण्ड डेथ अ‍ॅक्टचे १९६९ चे कलम ८ १३ ( ३ ) अन्वये जन्माची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब ( प्रथम श्रेणी ) यांचे न्यायालयात.**

**एम.जे.सी.क्रं.२३०/२०२६** **ने.ता.०९/१२/२०२६**

**अर्जदार :-** शेख वकील शेख अजीज
वय अं.६१ वर्ष, धंदा-मजुरी
रा.ईस्लाम नगर, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** मुख्याधिकारी साहेब
नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे शेख वकील शेख अजीज याचा जन्म दि.१५/०७/१९६५ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ अ‍ॅण्ड डेथ अ‍ॅक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **नामे शेख वकील शेख अजीज याचा जन्म दि.१५/०७/१९६५ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.०९/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१९/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७८७/२०२६** **ने.ता.१०/१२/२०२६**

**अर्जदार :-**
१) राजेंद्र कृष्णराव ढोले, वय अं.५१ वर्ष, धंदा-शेती
२) देवेंद्र कृष्णराव ढोले, वय अं.४८ वर्ष, धंदा-शेती
३) विरेंद्र कृष्णराव ढोले, वय अं.५१ वर्ष, धंदा-शेती
अर्जदार क्र.१ ते ३ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मय्यत नामे वासुदेवराव रतनसा ढोले व पार्वताबाई वासुदेवराव ढोले, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.१०/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०६/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# आता लढाई आरपारची! राज्यातील कंत्राटदारांचा आक्रमक पवित्रा : ठिय्या आंदोलनाला राज्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्य सरकारच्या विविध विभागांतील विकासकामे मार्गी लावल्यानंतरही ८६ हजार कोटींची देयके मिळवण्यासाठी कंत्राटदारांना मंत्रालयाच्या पायऱ्या झिझवाव्या लागत आहेत. अनेकदा पाठपुरावा करूनही पैसे देण्यास राज्य सरकार चालढकल करत असल्याने आतापर्यंत ९ कंत्राटदारांनी आत्महत्येचा पर्याय निवडला. तरी राज्य सरकार काहीच ठोस निर्णय घेत नसल्याने कंत्राटदारांनी आर पारची लढाई, असा इशारा दिल्याचे कंत्राटदार महासंघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी सांगितले. दरम्यान, मेलेल्या सरकारचा निषेध करण्यासाठी सोमवारी राज्यभरात आंदोलने केल्याचे त्यांनी सांगितले. राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री व इतर विभागांचे मंत्री यांनी आत्महत्या, प्रलंबित देयके व कंत्राटदार यांचे या मागण्या याबाबत तातडीने संघटनेच्या शिष्टमंडळ बरोबर बैठक घ्यावी व यावर अभ्यास समिती तातडीने स्थापन करणे, अन्यथा ही दिवाळी काळी साजरी करावी लागेल आणि यांस सर्वस्वी शासन व प्रशासन जबाबदार राहील असा इशारा कंत्राटदार महासंघाने दिला आहे.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८३६/२०२६** **ने.ता.२१/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती कलींदा पंजाबराव सोनारे, वय अं.६० वर्ष, धंदा-घरकाम, २) योगेश पंजाब सोनारे, वय अं.३९ वर्ष, धंदा-मजुरी, ३) रुपाली सतीश देशमुख, वय अं.४२ वर्ष, धंदा-घरकाम, ४) मेघा श्रीकांत निकम, वय अं.३६ वर्ष, धंदा-घरकाम, अर्जदार क्र.१ ते २ रा.वाडेगाव, ता.वरुड, जि.अमरावती, क्र.३ रा.शिरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती, क्र.४ रा.थुगांव (पिपरी) ता.चांदुरबाजार, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे पंजाबराव गुलाबराव सोनारे, रा.वाडेगांव, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२१/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०६/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८८२/२०२६** **ने.ता.०७/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती सुनिता आनंदराव लाडे, वय अं.४८ वर्ष, धंदा-घरकाम

२) सौ.रश्मी महेंद्र कोहळे, वय अं.३४ वर्ष, धंदा-घरकाम

अर्जदार क्र.१ रा.एकदरा, ता.वरुड, जि.अमरावती

क्र.२ रा.पवनी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मय्यत नामे आनंदराव वामनराव लाडे, रा.एकदरा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०७/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०६/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८७७/२०२६** **ने.ता.०५/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) भागीरथी मारोतराव चिमोटे, वय अं.९० वर्ष, धंदा-घरकाम

२) अंकुश साहेबराव चिमोटे, वय अं.३० वर्ष, धंदा-मजुरी

अर्जदार क्र.१ व २ रा.करजगांव, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मय्यत नामे साहेबराव मारोतराव चिमोटे, रा.करजगांव, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०५/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०६/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८९८/२०२६** **ने.ता.०६/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) बिंदुबाई सदाशिवराव उज्जैनकर, वय अं.८५ वर्ष, धंदा-घरकाम

२) मदन सदाशिवराव उज्जैनकर, वय अं.६० वर्ष, धंदा-शेती

३) प्रशांत सदाशिवराव उज्जैनकर, वय अं.५७ वर्ष, धंदा-शेती

४) रविंद्र सदाशिवराव उज्जैनकर, वय अं.५४ वर्ष, धंदा-शेती

अर्जदार क्र.१ ते ४ रा.पिंपळखुटा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मय्यत नामे सदाशिवराव बाबुशा उज्जैनकर, रा.पिंपळखुटा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०६/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०६/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# पाणीटंचाईचे कृती आराखडे सादर करा : पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांचे निर्देश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – कोकण, नागपूर आणि अमरावती विभागांतील संभाव्य पाणीटंचाईच्या सर्व टप्प्यांचे वस्तुनिष्ठ तसेच गावनिहाय कृती आराखडे येत्या २५ ऑक्टोबरपर्यंत सादर करावेत. याशिवाय जलजीवन मिशनअंतर्गत ७५ ते ९९ टक्के प्रगती झालेल्या पाणीपुरवठा योजना प्राधान्याने पूर्ण करून कार्यान्वित कराव्यात, असे निर्देश पाणी पुरवठा आणि स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी बुधवारी दिले. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री अतिथीगृह येथे नागपूर, अमरावती आणि कोकण विभागांतील पाणीपुरवठा योजना, भूजल पातळी आणि संभाव्य पाणीटंचाईच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. सध्या या विभागांत गंभीर पाणीटंचाई नसली, तरी आगामी महिन्यांतील संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने आतापासूनच सज्ज राहावे. अधिकारी, लोकप्रतिनिधी, सरपंच आणि ग्रामपंचायतींशी चर्चा करून तसेच प्रत्यक्ष पाहणीच्या आधारे कृती आराखडे तयार करण्याच्या सूचना पाटील यांनी केल्या. टँकरग्रस्त गावांसाठी द्या स्वतंत्र आराखडा जलजीवन मिशनअंतर्गत अंतिम टप्प्यात असलेल्या योजनांची पाइपलाईन, पंप, वीजजोडणी, रोहित्र आदींची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत. ७५ टक्क्यांपेक्षा अधिक प्रगती झालेल्या योजनांची पॅकेजविषयक माहिती पूर्ण करून प्रमाणित करावी, असेही पाटील म्हणाले. संभाव्य टँकरग्रस्त गावांसाठी जलस्रोत बळकटीकरणाचा स्वतंत्र आराखडा तयार करावा. जिल्हा नियोजन समितीच्या दोन टक्के निधीच्या तरतुदीतून स्रोत बळकटीकरणाची कामे प्राधान्याने हाती घ्यावीत.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८४२/२०२६** **ने.ता.२१/११/२०२६**

**अर्जदार :-** १) सुभाष बाबुरावजी निंबुरकर, वय अं.५६ वर्ष, धंदा-शेती, २) गजानन बाबुरावजी निंबुरकर, वय अं.५५ वर्ष, धंदा-शेती, क्र.१ व २ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, ३) सौ.सविता चंद्रशेखर राऊत, वय अं.५२ वर्ष, धंदा-घरकाम, रा.मुलताई, ता.मुलताई, ४) सौ.पुष्पा सतिशराव विरखडे, वय अं.४७ वर्ष, धंदा-घरकाम, रा.पिपळा, ता.सौंसर, ५) श्रीमती प्रतिभा प्रकाश निंबुरकर, वय अं.५८ वर्ष, धंदा-घरकाम, रा.शेंदुरजनाघाट, ६) स्नेहा रत्नाकर काळे, वय अं.३१ वर्ष, धंदा-घरकाम, रा.साखरखेडा, ता.नरखेड, ७) प्रिया अनिल विरखडे, वय अं.२८ वर्ष, धंदा-घरकाम,रा.रोशनखेडा, ता.वरुड

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत बाबुराव सितारामजी निंबुरकर व मयत शांताबाई उर्फ पार्वती बाबुराव निंबुरकर, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२१/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१५/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९२६/२०२६** **ने.ता.२३/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती शशी विद्यापती कानुगो, वय अं.६५ वर्ष, धंदा-घरकाम

२) विंशल रमेशचंद्र कानुगो, वय अं.३४ वर्ष, धंदा-व्यवसाय

३) श्रीमती विमला रमेशचंद्र कानुगो, वय अं.८७ वर्ष, धंदा-घरकाम

सर्व रा.वरुड, ता.वरुड, ह.मु.इंदौर ता.जि.इंदौर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत विद्यापती रमेशचंद्र कानुगो, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२६/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१६/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९२७/२०२६** **ने.ता.२०/११/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती विमला रमेशचंद्र कानुगो, वय अं.८७ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.वरुड, ता.वरुड, ह.मु.विजय नगर, इंदोर, २) संजय रमेशचंद्र कानुगो, वय अं.६१ वर्ष, धंदा-व्यवसाय, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, ३) सौ.मधुमती नरेश खंडेलवाल, वय अं.६३ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.ग्वालियर, ता.जि.ग्वालीयर, ४) श्रीमती शशि विद्यापती कानुगो, वय अं.६५ वर्ष, धंदा-व्यवसाय, ५) विंशल विद्यापती कानुगो, वय अं.३४ वर्ष, धंदा-व्यवसाय, क्र.४ व ५ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, क्र.४ व ५ ह.मु.विजय नगर इंदोर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत रमेशचंद्र कन्हैयालालजी कानुगो, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२०/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१६/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९२३/२०२६** **ने.ता.२३/११/२०२६**

**अर्जदार :-** १) नागेश चंपत लुंगे, वय अं.६० वर्ष, धंदा-शेती

२) विनोद चंपत लुंगे, वय अं.५५ वर्ष, धंदा-शेती, क्र.१ व २ रा.ढगा, ता.वरुड, जि.अमरावती, ३) सौ.वनिता प्रमोद राऊत, वय अं.५८ वर्ष, धंदा-घरकाम, रा.राजुराबाजार, ता.वरुड, जि.अमरावती, ४) सौ.सुनिता देवेंद्र ठाकरे, वय अं.५६ वर्ष, धंदा-घरकाम, रा.बेलज, ता.अचलपूर, जि.अमरावती, ५) सौ.संगीता संजय चिंचे, वय अं.५२ वर्ष, धंदा-घरकाम, रा.हनुमान नगर, नागपूर, ता.जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत चंपत पिसाराम लुंगे व मयत जयवंताबाई चंपतराव लुंगे, रा.ढगा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२२/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१६/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# चांदूर बाजार येथील खुनाचा उलगडा : आरोपीला अमरावतीतून अटक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीणची धडक कारवाई

## पाण्याच्या नळाच्या कॉकवरून झालेल्या वादातून हत्या केल्याचा आरोप



**अमरावती** – चांदूर बाजार येथील वसीम खान सादत खान यांच्या हत्या प्रकरणाचा उलगडा करण्यात स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीणच्या पथकाला यश आले आहे. या प्रकरणातील फरार आरोपी इमरान उर्फ आर्यन रहमत खान याला अमरावती येथून ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे खून प्रकरणातील तपासाला महत्त्वपूर्ण दिशा मिळाली आहे.

**किरकोळ वादातून हत्येची घटना**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार अर्थफाज खान सादत खान (वय ३९, रा. शिरजगाव बंड) यांचा भाऊ वसीम खान सादत खान (वय ३२) आणि आरोपी इमरान उर्फ आर्यन रहमत खान यांच्यात किरकोळ कारणांवरून वारंवार वाद होत होते. आरोपीकडून वसीम खान यांना जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. दि.२० ऑक्टोबर २०२६ रोजी पाण्याचा नळ सुरू करण्याच्या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला होता. त्यावेळी उपस्थित नागरिकांनी मध्यस्थी करून वाद मिटवला. मात्र, या वादातून आरोपीच्या मनात राग कायम असल्याचा आरोप पोलिसांनी दिलेल्या माहितीत करण्यात आला आहे.

**महाविद्यालय परिसरात धारदार शस्त्राने हल्ला**

२१ ऑक्टोबर २०२६ रोजी वसीम खान हे चांदूर बाजार येथील टॉम्पे महाविद्यालयात असताना आरोपीने त्यांच्यावर धारदार चाकूने हल्ला करून त्यांची हत्या केल्याची तक्रार पोलिसांत दाखल झाली. या तक्रारीवरून चांदूर बाजार पोलीस ठाण्यात अप. क्र. ४९५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), ३(५), ३५१(२) व ३५१(३) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

**अमरावतीत सापळा रचून आरोपीला पकडले**

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी आरोपीला तातडीने अटक करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मार्गदर्शन करून आवश्यक निर्देश दिले. अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने फरार आरोपीचा शोध सुरू केला. दरम्यान, आरोपी अमरावती येथे असल्याची आणि तेथून पळून जाण्याच्या प्रयत्नात असल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी अमरावती येथे सापळा रचून इमरान उर्फ आर्यन रहमत खान याला शिताफीने ताब्यात घेतले.

**आरोपीच्या हातांना जखमा; रुग्णालयात उपचार**

आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर त्याची गुन्ह्यासंदर्भात चौकशी करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, त्याने नळाचा कॉक सुरू करण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून वसीम खान यांची हत्या केल्याची कबुली दिली. आरोपीच्या दोन्ही हातांवर रक्ताचे डाग आणि जखमा आढळल्याने त्याला उपचारासाठी जिल्हा रुग्णालय, अमरावती येथे नेण्यात आले. उपचारानंतर त्याला पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी चांदूर बाजार पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास चांदूर बाजार पोलीस करीत आहेत.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी कारवाई**

पोलीस अधीक्षक निकेतन कदम आणि अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. या पथकात सहायक पोलीस निरीक्षक संतोष गुर्जर, पोलीस अंमलदार बळवंत दाभणे, भूषण पेठे, निलेश डांगोरे, गणेश आगोले तसेच सायबर विभागाचे रितेश गोस्वामी, प्रविण अंबाळकर आणि चालक नईम शहा यांचा सहभाग होता.

# दर्यापूरमध्ये जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेचा छापा!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल : ९ लाख ३३ हजारांचा मुद्देमाल जप्त




**दर्यापूर** – शहरातील राजपूतपुरा परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीणच्या पथकाने छापा टाकून १३ जणांविरुद्ध कारवाई केली. या कारवाईत रोख रकमेसह मोबाईल, दुचाकी आणि चारचाकी वाहन असा एकूण ९ लाख ३३ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील अवैध जुगार व्यवसायाला आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने विशेष मोहीम हाती घेतली आहे. त्याअंतर्गत १९ ऑक्टोबर २०२६ रोजी दर्यापूर उपविभागातील पथक गस्तीवर असताना, राजपूतपुरा येथील गजेंद्र गोपालसिंग बैस याच्या घरी पैशांची बाजी लावून 'एक्का बादशाह' नावाचा पत्त्यांचा जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापा टाकला असता, ५२ पत्त्यांच्या साहाय्याने जुगार खेळणारे १३ जण आढळून आले. पोलिसांनी कारवाई करत त्यांच्याकडून १ लाख ८ हजार ४५० रुपये रोख, १३ मोबाईल (किंमत ८५ हजार रुपये), तीन दुचाकी (किंमत २ लाख ४० हजार रुपये), एक स्विफ्ट कार (किंमत ५ लाख रुपये) आणि पत्ते असा एकूण ९ लाख ३३ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी दर्यापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. पथकात पोलीस उपनिरीक्षक सतीश झाल्टे, पोलीस अंमलदार मंगेश लकडे, सचिन मसांगे, हर्षल काळे आणि चालक हर्षद घुसे यांचा सहभाग होता. जिल्ह्यात अवैध जुगार आणि इतर बेकायदेशीर धंद्यांविरुद्ध कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांच्या मोहिमेतून स्पष्ट झाले आहे.

# दांभिकता सोडून नैतिकतेचा मार्ग धरा

## आयुक्त तुकाराम मुंढे यांचे तरुणाईला आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**कराड** – अन्याय होत असताना आपण अनेकदा विरोध करण्याऐवजी दुसऱ्याने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा करतो. ही मानसिकता बदलण्यासाठी स्वतःपासून सुरुवात करा.

दांभिकता सोडून नैतिकतेचा मार्ग स्वीकारा आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवा, असे आवाहन महाराष्ट्र राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी केले. कराड येथील शारदीय व्याख्यानमालेत 'तरुणाईशी संवाद' या विषयावर ते बोलत होते.

यावेळी माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, नगराध्यक्ष राजेंद्र यादव, उपनगराध्यक्ष पोपटराव साळुंखे, मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर, प्रा. बी. एस. खोत यांच्यासह आजी-माजी नगरसेवक, नगरसेविका आणि नगरपालिका व नगरवाचनालयाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्रीपद भूषवले. देशाचे संरक्षण मंत्री म्हणूनही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. सहकार, औद्योगिक विकास, शिक्षण, पंचायतराज, कृषी आणि सिंचन क्षेत्रांत त्यांनी विकासाची दिशा दिली. त्यांच्या विचारांचा महाराष्ट्र घडवण्यासाठी तरुणांनी अन्यायाविरुद्ध उभे राहून सामाजिक परिवर्तनासाठी काम केले पाहिजे, असे मुंढे यांनी सांगितले. तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात साधने बदलत असली, तरी योग्य-अयोग्य ठरवण्याची जबाबदारी माणसाचीच आहे.




